**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.४५ वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

जा.क्र.पंसश्री/प्रशासन/वशी/१/८५१ /२०२६
पंचायत समिती कार्यालय,श्रीवर्धन,
दिनांक १५ /०३/२०२६

प्रति,

मा.श्री/श्रीमती.........................................................................................
पंचायत समिती सभापती/उपसभापती/सदस्या/सदस्य
मु.पो...............................................तालुका श्रीवर्धन, जि.रायगड

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड
२. मा. आमदार कु.अदिती सुनिल तटकरे मॅडम,गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड
३ मा. अध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
४. मा. उपाध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
५. मा. सभापती सो................................................समिती रायगड जिल्हा परिषद अलिबाग
६. मा. विरोधी पक्षनेता रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
८. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.
९. मा. खाते प्रमुख (सर्व)..............................................................रा.जि.प. अलिबाग.

प्रत:- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------

प्रत :- पंचायत समितीमधील सर्व शाखा प्रमुख, शाखा / कनिष्ठ अभियंता (बांधकाम /एस्.एस्.ए.)
सहाय्यक / कनिष्ठ लेखाधिकारी, कृषि अधिकारी (जनरल /वि.घ.यो.)
विस्तार अधिकारी (सर्व)......................................पंचायत समिती श्रीवर्धन.

सचिव तथा गट विकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.४५ वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

**इतिवृत्त भाग १**

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्य | उपस्थित अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|
| दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.४५ वाजता | १)मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.<br>प्र.सभापती / उपसभापती पं.स.<br>२)मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो.<br>पंचायत समिती सदस्य<br>३) मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे<br>पंचायत समिती सदस्य<br>४) मा.श्री. सचिन नंदाकर किर<br>पंचायत समिती सदस्य | १) सचिव तथा गट विकास अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>२) पशुधन विकास अधिकारी, पं.स.श्रीवर्धन<br>३)तालुका आरोग्य अधिकारी,श्रीवर्धन<br>४) उपअभियंता (ग्रा.पा.पु.),रा.जि.प.उपविभाग,म्हसळा<br>५) उपअभियंता (बांध.) (प्र),रा.जि.प.उपविभाग,श्रीवर्धन<br>६) बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन<br>७) गट शिक्षणाधिकारी (प्र),पं.स.श्रीवर्धन<br>८) तालुका कृषी अधिकारी,श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>९) विस्तार अधिकारी (पंचायत) १ पं.स.श्रीवर्धन<br>१०) विस्तार अधिकारी (आरोग्य) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>११) विस्तार अधिकारी (कृषी) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>१२) सहाय्यक लेखाधिकारी,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१३) शाखा अभियंता,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१४) कनिष्ठ अभियंता,पं.स.श्रीवर्धन<br>१५) सहाय्यक प्रशासन अधिकारी, (प्र) पं.स.श्रीवर्धन<br>१६) कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>१७) पशुधन पर्यवेक्षक,पं.स.श्रीवर्धन.<br>१८) गटसन्वयक (MSRLM) (प्र.) ,पं.स.श्रीवर्धन<br>१९) कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन),पं.स.श्रीवर्धन |

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २४/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.४५ वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

## संक्षिप्त इतिवृत्त भाग-१

सभेच्या प्रारंभी मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.,प्र.सभापती,पं.स.श्रीवर्धन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व सर्वानी राष्ट्रगीत / महाराष्ट्र गीत म्हटले.

श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सर्वसाधारण सभेस उपस्थित मा. श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.प्र.सभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो, पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे सो, पं.स.सदस्या, मा.श्री. सचिन नंदाकर किर सो, पं.स.सदस्य यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच सभेस उपस्थित सर्व खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती मा.प्र.सभापती सो यांना केली.

मा. मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो., प्र.सभापती यांनी श्रीवर्धनची गांवदेवी सोमजाई मातेस वंदन करुन सभेस उपस्थित मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे मॅडम,पं.स.सदस्या, मा.श्री. सचिन नंदाकर किर, पं.स.सदस्य तसेच मा.श्री.राजू दुंदा किरवे गट विकास अधिकारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित सर्व खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर मा.प्र.सभापती यांनी गट विकास अधिकारी तथा सचिव यांना सभेचे कामकाजास सुरूवात करणेबाबत सुचित केले.

## दु:खवटा ठराव

१) कै.मा.श्री.अजित दादा पवार उपमुख्यमंत्री यांचे दिनांक २८/०१/२०२६ रोजी विमान दुर्घटनेमध्ये दु:खद निधन झालेबद्दल.

२) कै.मा.श्री.भाई साहेब पाशिलकर रायगड जिल्हा परिषद माझी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती यांचे दिनांक १४/०२/२०२६ रोजी दु:खद निधन झालेबद्दल.
दु:खद निधन झालेल्या व्यक्तीच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी म्हणून सभागृहात श्रध्दांजली वाहणेत आली.

## अभिनंदन ठराव

१) रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुक २०२६ मध्ये निवडून आलेल्या जिल्हा परिषद सर्व सदस्य व पंचायत समिती मधील सर्व सदस्यांचे अभिनंदनाचा ठराव सभागृहात मांडला त्याला सर्वानूमते मंजूरी देणेंत आली.

**विषय क्र १ :-** मागिल मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
मागिल मासिक सभेचे इतिवृत्ताचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ते सर्वानुमते मंजूर करणेंत आले.

**विषय क्र २ :-** मागिल मासिक सभेतील ठराव पूर्ततेचा आढावा घेणे.
मागिल मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ठराव पूर्ततेचा आढावा घेणेंत आला.

**विषय क्र ३ :-** मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे.
मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते.

**विषय क्र ४ :-** मा.सदस्यांचे रजेचे अर्ज मंजूर करणे.
मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नव्हते.

**विषय क्र ५ :-** महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे.

महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी लिमिटेड यांचेकडील श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायत यांना सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना (PWW) व रोडलाईट (Street Light) यांच्या थकबाकी वीज देयका बाबत आलेल्या पत्राचे वाचन केले.

**विषय क्र ६ :-** मागील महात पंचायत समिती सेस खर्चास मंजूरी देणे.

पंचायत समिती सेस मधुन माहे फेब्रुवारी २०२६ अखेर खर्च ३,२२,४३०/- आहे. असे श्री.अभिषेक पुणेकर, (प्र) सहाय्यक लेखाअधिकारी पं.स.श्रीवर्धन यांनी सभागृहात सांगितले. तसेच पुढे म्हणाले की, पंचायत समिती सेस सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षामधील रक्कम रु.४२,०३,०००/- इतका निधी प्राप्त झालेला असून माहे फेब्रुवारी २०२६ अखेर पर्यंत रक्कम रू.५,२४,२२०/- इतका निधी खर्च झाला आहे.

**विषय क्र. ७ :-** तालुक्यातील खाते प्रमुखांकडील विकास कामांचा आढावा घेणे.

**पशुसंवर्धन विभाग :-** श्रीम.सचिन इंदुलकर, पशुधन विकास अधिकारी यांनी पशुसंवर्धन विभागाकडील आढावा पुढील प्रमाणे सभागृहाला दिला. त्यांच्या विभागाचा रिक्त पदांचा अहवाल सादर केला.

मा.श्री.सुकुमार तोंडलेकर,पं.स.सदस्य म्हणाले की, तालुक्यामध्ये अंदाजे किती जनावरे आहेत.

श्रीम.सचिन इंदुलकर, पशुधन विकास अधिकारी यांनी तालुक्यामध्ये अंदाजे (३५०० गायी व १७०० म्हशी ) आहेत असे म्हणाले. कारण तालुक्यामध्ये ६५% लोक शेती करत नसल्यामुळे लोक गायी म्हशी पाळत नाहीत.

मा.श्री.सुकुमार तोंडलेकर म्हणाले गोहत्या झाल्या नंतर पंचनामा कोण करतो.

श्रीम.सचिन इंदुलकर, पशुधन विकास अधिकारी म्हणाले की पंचनामा पोलीस खात्याकडून होतो पशुवैद्यकीय अधिकारी प्रयोगशाळा तपासणी करिता नमुना घेतात.

**तालुका आरोग्य अधिकारी :-** डॉ श्री.नारायणकर, तालुका आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य विभागाचा आढावा दिला.

मा.गट विकास अधिकारी यांनी लसिकरणाबाबत विचारणा केली. त्याप्रमाणे लसिकरण करणे सुरू आहे. त्यामध्ये ॲनिमियाचे दोन पेशंट होते त्यांना पुढील उपचारासाठी रेफर करणेत आले असे सांगितले.

मा.श्री. सुकुमार तोडलेकर पं.स सदस्य यांनी तालुक्यातील आरोग्य अधिकारी किती कार्यरत आहेत असे विचारले.

त्यावर श्री.नारायणकर यांनी ५ डॉक्टर कमी आहेत असे सांगितले. तसेच लाईट बीला करीता तरतुद नसल्या करणाने लाईट कट करण्याची कारवाई केली जाते. आरोग्य सेवा ही २४ तास द्यावी लागत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत मार्फत लाईट बील भरणेची तजवीज व्हावी.

त्यावर मा.तोडलेकर सदस्य यांनी सांगितले की स्ट्रीट लाईट किंवा कार्यालयीन लाईट बीला करीता आता तरतुद येणार नसुन आपले लाईट बील आपण स्वत: भरण्याचे आहे. तद्नंतर श्री.नागे विस्तार अधिकारी यांनी वरील लाईट बीला बाबतचे महावितरण विभाग श्रीवर्धन यांचेकडील पत्राचे वाचन केले. सदर पत्रामध्ये मुदत्तीत लाईट बील भरण्यात यावे अन्यथा लाईट कट केली जाईल असे नमुद करणेत आले होते.

**उपअभियंता (बांधकाम) :-** श्री.सौरभ भगत उप अभियंता व श्री.स्वप्नील आंधळे सहा.अभियंता यांनी आढावा दिला.

मा.श्री.सुकुमार तोडलेकर पं.स.सदस्य यांनी प्रगती पथावर असलेल्या कामांची माहिती देणे बाबत सांगितले तसेच सन २०२३-२४, २०२४-२५ या दोन वर्षामध्ये मंजुर झालेल्या कामांची माहिती देण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री.आंधळे यांनी आढावा दिला.

मा.श्रीम.चोरगे सदस्य यांनी २०% सेस मधून शिरवली आदिवासीवाडी येथे कोणती कामे झाली याची माहिती मागितली.

बाल विकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन - श्री.प्रफुल्ल बागल बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

मा.ग.वि.अ यांनी SAM /MAM चा आढावा घेतला त्यानुसार श्री.बागल यांनी SAM मध्ये ० बालके आहेत व MAM मधील १७ बालकांचे औषधोपचार सुरू आहे.

मा.श्री.सचिन किर सदस्य यांनी अंणवाडी सेविका मदतनीस रिक्त पदांबाबत माहिती मागितली.

मा.श्री.तोंडलेकर सदस्य यांनी आहार चांगल्या दर्जाचे आहे अगर कसे हे कोण पाहणी करतो.

त्यावर श्री.बागल यांनी सांगितले की CDPO, विस्तार अधिकरी व पर्यवेक्षिका हे पाहणी करतात असे सांगितले.

त्यावर मा.श्री.तोंडलेकर सदस्य यांनी आहार चांगल्या दर्जाचे असल्याचे तपासून मुलांना देण्यास सांगितले.

**<u>ग्रामीण पाणी पुरवठा</u> :-** श्रीम.शेफाली देशमुख उपअभियंता यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

मा.श्री.सचिन किर सदस्य यांनी भावे, वडवली, दिघी, आदगाव, व सर्वे जल जिवन मिशन संदर्भात विचारणा केली.

श्रीम.शेफाली देशमुख यांनी सांगितले की वडवली, सर्वे, भावे या ३ ठिकाणची कामे पुर्ण झाले असून दिघीचे रिटेंडरींगचे काम सुरू आहे. व आदगावचे काम सुरू करणेत आले आहे असे सांगितले.

श्री.सुकुमार तोंडलेकर सदस्य, यांनी बोर्ली येथील कॉन्ट्रक्टर कोण आहे असे विचारले.

त्यावर श्रीम.देशमुख यांनी श्री.दत्ता पवार हे कॉन्ट्रक्टर असल्याचे सांगितले.

त्यावर श्री. सुकुमार तोंडलेकर सदस्य, यांनी श्री.दत्ता पवार यांचे कामा बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

श्री.सुकुमार तोंडलेकर सदस्य, यांनी बोर्ली येथील किती रक्कमेचे कामे झाले आणि किती रक्कम शिल्लक आहे असे विचारले.

त्यावर श्रीम.देशमुख यांनी सदरचे काम हे ४.५० कोटी चे आहे व सध्यास्थितीत १.२५ कोटी खर्च झाले आहे असे सांगितले.

त्यानंतर श्री.नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी बोर्ली येथील जुनी पाईपलाईन बदलण्यात यावी जेणेकरून भविष्यात पाणी टंचाई होणार नाही तसेच बोर्ली येथील बंधाऱ्याचे स्ट्रक्चर ऑडीट करण्यात यावे असे सांगितले.

**<u>शिक्षण विभाग</u> :-** श्री.कोळेकर,प्रतिनिधी विषय शिक्षक, पं.स.श्रीवर्धन यांनी शिक्षण विभागाचा आढावा दिला.

मा.श्री.तोंडलेकर सदस्य यांनी शालेय पोषण आहार पुरवठा कोण करतो असे विचारले.

श्री.कोळेकर ,प्रतिनिधी विषय शिक्षक,पं.स.श्रीवर्धन यांनी साई ट्रेडींग कंपनीची निवड जिल्हा परिषदे कडून नेमणूक केलेली आहे ते तालुक्यातील शाळांवर धान्य पोहोच करतात. पोषण आहार पहाणी गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण, केंद्रप्रमुख करतात.

मा.श्री.तोंडलेकर सदस्य यांनी शाळेतल्या मुलांचे आरोग्य तपासणी करणेत यावी.

त्यावर डॉ.श्री.नारायणकर यांनी RBSK मार्फत मुलांची आरोग्य तपासणी करतात तालुक्यातील ७५% मुलांची शालेय आरोग्य तपासणी केलेली आहे असे सांगितले.

मा.श्री.तोंडलेकर सदस्य यांनी शाळा आरोग्य तपासणीच्या वेळी शालेय व्यवस्थापन समिती ने उपस्थित रहाणे बाबत कळविण्यात यावे असे सुचित केले.

ग्रामपंचायत विभागः- श्री.किशोर नागे, वि. अ. (पं) यांनी ग्रामपंचायत विभागाचा आढावा दिला. त्यांमध्ये त्यांनी ४३ ग्रामपंचायती मधील १८ ग्रमपंचायत मध्ये प्रशासक कार्यरत आहेत.

मा.श्री.तोंडलेकर सदस्य म्हणाले की ग्रामपंचायत हाद्दितील सर्व स्ट्रिट लाईट बील व पाणी पुरवठा योजनांची बीले ग्रामपंचायत मार्फत भरण्यात यावी अशी सुचना श्री.नागे यांना दिली.

**तालुका कृषी विभाग** :- श्रीम.श्रद्धा डुंबरे, (प्रतिनिधी) तालुका कृषी अधिकारी,पं.स.श्रीवर्धन यांनी कृषी विभागाचा आढावा दिला.

**कृषी विभाग पं.स** :- श्रीम.राधा कऱ्हाळे, विस्तार अधिकारी कृषी, यांनी कृषी विभागाचा आढावा दिला.

**खारभुमी:-** श्री.मयुर मुळीक यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

मा.श्री.सचिन किर सदस्य यांनी दिघी कार्लास बंधाऱ्याचे काम घेणे असे सुचित केले.

**एम.एस.आर.एल.एम.विभाग** :-_श्री.स्वप्नील जाधव, BMM,प.स,श्रीवर्धन यांनी एम.एस.आर.एल.एम.विभागाचा आढावा दिला.

श्रीम.पुजा शिंदे प्र.सभापती यांनी तालुक्यातील किती बचत गटांनी व्यवसाय सुरू केले असे विचारले.

श्री.स्वप्नील जाधव, BMM,प.स,श्रीवर्धन यांनी ३ बचत गटांनी व्यवसाय सुरू केले आहे.

**राज्य परिवहन महामंडळ** :- श्रीम.शर्वरी लांजेकर यांनी त्यांच्या राज्य परिवहन महामंडळ विभागाचा आढावा दिला. त्यामध्ये त्यानी श्रीवर्धन आगारामध्ये खालील प्रमाणे रिक्त पदांचा अहवाल दिला.

| अ.क्र | पदनाम | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ सहाय्यक | ३ | १ | २ |
| २ | वाहन नियंत्रक | १२ | १२ | ० |
| ३ | लिपिक | १६ | ७ | ९ |
| ४ | कार्यशाळा | ६८ | ३२ | ३६ |
| ५ | चालक / वाहक | २४० | १६४ | ७६ |
| | एकूण | ३३९ | २१६ | १२३ |

सध्यास्थितीत एकूण मंजूर पदे ३२९ आहेत त्यापैकी २१६ पदे भरलेली आहेत व १२३ पदे रिक्त आहेत असे सांगितले.

**विषय क्र. ८** :- **पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे.**

पंचायत समिती श्रीवर्धनची पुढील मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती श्रीवर्धनच्या महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक. ९** :- **मा.प्र.सभापती सो. यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.**

आयत्या वेळेचे विषय ---निरंक---

सभेचा समारोप करतांना मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.,प्र.सभापती, पंचायत समिती यांनी सभेस उपस्थितीत मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे पं.स.सदस्य सो., मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य मा.श्री. सचिन नंदाकर किर,पं.स.सदस्या, यांचे आभार मानले तसेच सभेस उपस्थित खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन मा. सभापती सो., यांचे वतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)**
**पंचायत समिती श्रीवर्धन**

**(श्रीम.पुजा प्रशांत शिंदे)**
**प्र.सभापती**
**पंचायत समिती श्रीवर्धन**

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

<table>
<tr><th rowspan="2">सभेची तारीख व वेळ</th><th rowspan="2">प्रस्तावाचा विषय</th><th rowspan="2">प्रस्तावाचा मजकूर</th><th rowspan="2">सूचक अनुमोदक</th><th colspan="2">दुरुस्ती असल्यास</th><th colspan="2">दिलेल्या मतांची संख्या</th><th colspan="2">दुरुस्ती नंतर मतदाना नंतर अंतिम निर्णय</th></tr>
<tr><th>सूचक</th><th>अनुमोदक</th><th>बाजूने</th><th>विरुध्द</th><th>मजकूर</th><th>ठराव क्र.</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td><td>७</td><td>८</td><td>९</td><td>१०</td></tr>
<tr><td>दिनांक:<br>२४/०३/२०२६<br>रोजी सकाळी<br>ठिक ११.४५<br>वाजता</td><td><u>दु:खवटा ठराव</u><br><br><br><u>अभिनंदन ठराव</u></td><td colspan="8">ठराव क्र.१ <u>दु:खवटा ठराव</u><br><br>१) कै.मा.श्री.अजित दादा पवार उपमुख्यमंत्री यांचे दिनांक २८/०१/२०२६ रोजी विमान दुर्घटनेमध्ये दु:खद निधन झालेबद्दल हि पंचायत समितीची सभा दु:खवटा व्यक्त करित आहे.<br><br>२) कै.मा.श्री.भाई साहेब पाशिलकर रायगड जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समिती सभापती यांचे दिनांक १४/०२/२०२६ रोजी दु:खद निधन झालेबद्दल.<br>दु:खद निधन झालेल्या व्यक्तीच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी म्हणून सभागृहात श्रध्दांजली वाहणेत आली.<br><br>सूचक:- मा.श्रीम. पुजा प्रशांत शिंदे, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर<br><br>ठराव क्र.२ <u>अभिनंदन ठराव</u><br><br>रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुक २०२६ मध्ये निवडून आलेल्या जिल्हा परिषद सर्व सदस्य व पंचायत समिती मधील सर्व सदस्यांचे ही पंचायत समितीची सभा त्यांचे सर्वानुमते हार्दिक अभिनंदन करीत आहे.<br><br>सूचक:- मा.श्रीम. पुजा प्रशांत शिंदे, सभापती<br>ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
</table>

## पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रंमाक:-१**<br>मागिल माहात मागिल सभेच्या इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे | पुर्तता<br>पंचायत समितीच्या मागिल सभेच्या इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा भाग एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे घेणेत आला. |
| | **विषय क्रंमाक:-२**<br>मागिल महाच्या मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन. | पुर्तता<br>मागिल माहाचे मासिक सर्वसाधारण सभेचे ठराव पुर्तता वाचन नाही. |
| | **विषय क्रमांक:-३**<br>मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे. | पुर्तता<br>मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते. |
| | **विषय क्रमांक:- ४**<br>मा.सदस्यांच्या रजा मंजूर करणे. | पुर्तता<br>सन्मा सदस्यांचे रजेच्या अर्जास मंजूरी इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा पंचायत समिती सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत. |
| | **विषय क्रमांक:- ५**<br>महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे. | पुर्तता<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्या प्रमाणे. |

## पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्रमांक:- ६**<br>मागिल महात केलेल्या पंचायत समिती सेस खर्चास मंजूरी देणे. | पुर्तता<br>पंचायत समिती सेस माहे फ्रेब्रुवारी २०२६ अखेर चा खर्च रक्कम रू.५,२४,२२०/- इतका निधी खर्च आहे. |
| | **विषय क्रमांक:- ७**<br>विकास कामांचा आढावा घेणे. | पुर्तता.<br>खाते प्रमुख, पशुधन विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (बांधकाम), बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु),ग.शि.अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), शाखा अभियंता (बांध.) (प्रभारी), कनिष्ठ अभियंता इ. मागील महात केलेल्या कामांचा आढावा सभागृहाला दिला. |
| | **विषय क्र.७ (२) (१)**<br>पं.स आरोग्य विभाग रिक्त पदे भरणे बद्दल. | **ठराव क्र.३**<br>पंचायत समिती श्रीवर्धन अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र दोन असून ८ डॉक्टर मंजूर आहेत. त्यापैकी सद्यास्थितीत २ डॉक्टर कार्यरत आहे. श्रीवर्धन तालुका हा ग्रामिण भाग असल्याने येथे वैद्यकिय सुविधांचा आभाव असल्या कारणाने रिक्त असलेली ६ पदे भरणे बाबत ही पंचायत समितीची सभा हा ठराव सर्वानुमते पारीत करीत आहे.<br>**सूचक :-** मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर पं.स.सदस्य<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| | **विषय क्र.७ (२) (२)**<br>पं.स आरोग्य विभाग रूग्णवाहीका मिळणेबाबत | **ठराव क्र.४**<br>पंचायत समिती श्रीवर्धन अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र दोन असून पुर्ण तालुक्याला दोनच रूग्णवाहीका आहेत व आपातकालीन प्रसंगाच्या वेळी किंवा अपघाताच्या वेळी सर्व रूग्णाना तात्काळ पुढील उपचाराकरीता तातडीने वैद्यकिय सेवा मिळणेकरीता आणखी दोन रूग्णवाहीका मिळणेबाबत पंचायत समितीची सभा हा ठराव सर्वानुमते पारीत करीत आहे.<br>**सूचक :-** मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर पं.स.सदस्य<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)**

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्र.७ (१०) (१)**<br>श्रीवर्धन आगारातील कर्मचारी रिक्त पदे भरणे बद्दल. | **ठराव क्र.५**<br>श्रीवर्धन तालुका हा दुर्गम व डोगराळ भाग असल्यामुळे येथे वाहतूक सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. तसेच श्रीवर्धन आगारामधील मोठ्या प्रमाणात रिक्त असणारी चालक/ वाहक पदे लवकरात लवकर भरणे बाबत ही पंचायत समिती सभा हा ठराव सर्वानुमते पारीत करीत आहे.<br><br>**सूचक :-** मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर पं.स.सदस्य<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| | **विषय क्र.७ (६) (१)**<br>पं.स समाजकल्याण मागासवर्गीय वाड्या वस्ती मध्ये सोलार पथदिवे बसविणे बाबत | **ठराव क्र.६**<br>**पंचायत समिती सेस फंड सन २०२५-२६ मधून समाजकल्याण विभागा मार्फत मागासवर्गीय वाड्यांमध्ये खालील यादी प्रमाणे सोलार पथदिवे बसविणे बाबत पंचायत समितीची सभा हा ठराव सर्वानुमते पारीत करीत आहे.** |

| अ.क्र | गटाचे नाव | गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | बार्लीपंचयतन गट | हरवित बौध्दवाडी |
| २ | | कुडगांव रोहिदासवाडी |
| ३ | | कुडगांव आदिवासीवाडी |
| ४ | | सर्व बौध्दवाडी |
| ५ | | आदगांव बौध्दवाडी |
| ६ | | वेळास बौध्दवाडी |
| ७ | | बोर्लीपंचतन बौध्दवाडी |
| ८ | | बोर्लीपंचतन रोहिदारस बौध्दवाडी |
| ९ | | बोर्लीपंचतन बुरूड समाज |
| १० | | कुडकी आदिवासीवाडी |
| ११ | | वडवली आदिवासीवाडी |
| १२ | | कार्ले आदिवासीवाडी |

| | | |
|---|---|---|
| १३ | आराठी गट | भोस्ते आदिवासीवाडी |
| १४ | | दांडा आदिवासीवाडी |
| १५ | | चिखलप आदिवासीवाडी |
| १६ | | गालसुरे आदिवासीवाडी |
| १७ | | कोलमांडला आदिवासीवाडी |
| १८ | | चिखलप बौध्दवाडी |
| १९ | | खारगांव बौध्दवाडी |

**सूचक :-** मा.श्री.सचिन नंदाकर किर पं.स.सभापती

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक :- ८**
पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे.

पुर्तता
पंचायत समिती श्रीवर्धनची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती श्रीवर्धन येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**विषय क्रमांक:-९**
मा.सभापती सो.,यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.

पुर्तता
मा.सभापती सो., यांच्या परवानगीने चर्चेला येणारे आयत्या वेळेचे विषय नाहीत.

सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

(श्रीम.पुजा प्रशांत शिंदे)
प्र.सभापती
पंचायत समिती श्रीवर्धन